# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 01.07.2024** **वार – सोमवार**

---

**पालख्या पुणे मुक्काम**

आषाढी वारी निमित्त पंढरपूरकडे निघालेल्या संत श्री तुकाराम महाराज यांच्या पालखीचा मुक्काम आज नाना पेठेतील निवडुंग्या विठ्ठल मंदिरात आणि संत श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखीचा भवानी पेठेतील पालखी विठोबा मंदिरात आहे. या दोन्ही ठिकाणी पालख्यांचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी पहाटेपासून गर्दी केली आहे. शहर आणि उपनगरात अनेक स्वयंसेवी संस्था, संघटनांकडून वारकऱ्यांना सेवा पुरवण्यात येत आहे. यामध्ये वारकऱ्यांना मेट्रोची सफर, रेनकोट वाटप, मोफत कर्करोग तपासणी शिबिर, मोफत नेत्र तपासणी तसंच चष्मे वाटप करण्यात आले. वारकऱ्यांनी या मुकामात पर्यटन स्थळांनाही भेट दिली. दिवसभर अखंड हरिनामाचा गजर सुरू असल्याने शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झालं आहे.

**औषध पेटी वाटप**

आरोग्यदायी वारीसाठी आज पुण्यात विश्वास आधार स्वयंरोजगार संस्था आणि क्रिएटिव्ह फाउंडेशन च्या वतीनं औषध पेटयांचं वाटप करण्यात आलं. पालखी सोहोळा निर्विघ्न पार पडावा आणि वारी दरम्यान सर्व वारकऱ्यांची प्रकृती उत्तम रहावी हीच पांडुरंगा चरणी प्रार्थना असल्याचं केंद्रीय सहकार आणि नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी यावेळी सांगितलं.

**गिरीष महाजन वारी**

आषाढी वारी स्वच्छ, निर्मल आणि सुरक्षित व्हावी यासाठी शासन प्रयत्नशील असून निर्मल वारीसाठी सर्वांचा सहभाग महत्त्वाचा आहे, असं प्रतिपादन ग्रामविकास आणि पंचायतराज मंत्री गिरीष महाजन यांनी केले. ते आज विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित निर्मल दिंडीच्या शुभारंभ प्रसंगी बोलत होते. पालखी प्रस्थान आणि गावातला विसावा संपल्यानंतर दुसऱ्या दिवशी गाव आणि परिसराची स्वच्छता करण्याची खबरदारी घेण्याचं आवाहन त्यांनी केलं. माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी दिलेल्या हरितक्रांतीच्या संदेशानुसार त्यांच्या जयंतीनिमित्त सर्वांनी पालखी मार्गावर वृक्षलागवडीचा संकल्प करावा, असंही महाजन म्हणाले.

**सर्वधर्मीय ऐक्य दिंडी**

पुण्यात पंढरपूर वारीनिमित्त सर्वधर्मीय ऐक्य दिंडीचं आयोजन करण्यात आलं होतं. यामध्ये मुस्लिम को-ऑपरेटिव्ह बँक, रिझवानी मस्जिद ट्रस्ट, सुफी वारकरी विचारमंच साखळीपीर तालीम आणि राष्ट्रीय मारुती मंदिर यांचा समावेश होता.

**निसर्ग वारी**

पुण्यातल्या माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी माध्यमिक विद्यालयात आज पर्यावरण पूरक वारी अर्थात निसर्गवारी या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं.

**अपघात**

वारकऱ्यांना घेऊन निघालेला टेम्पो उलटल्याची घटना कात्रज -कोंढवा रस्त्यावरील शिवशंभोनगर परिसरात काल रात्री घडली. या अपघातात 20 वारकऱ्यांना दुखापत झाली असून, याप्रकरणी टेम्पोचालकाविरुद्ध भारती विद्यापीठ पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

**बैठक**

आगामी विधानसभा निवडणुकीची चर्चा करण्यासाठी भाजप कार्यकारी समितीची व्यापक बैठक येत्या 14 रोजी पुण्यात होत असून केंद्रीय गृहमंत्री आणि पक्षाचे ज्येष्ठ नेते अमित शाह या बैठकीला उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

**पदभार**

लेफ्टनेंट जनरल धीरज सेठ यांनी आज पुण्यातील लष्कराच्या दक्षिण मुख्यालयाचे प्रमुख म्हणून पदभार स्वीकारला. युद्ध स्मारकाला भेट देऊन त्यांनी सैनिकांना आदरांजली वाहिली. सदर्न कमांडच्या मुख्यालयात त्यांना गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला.

**वसंतराव नाईक जयंती**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आज हरितक्रांतीचे प्रणेते, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली कुलगुरू प्रा. सुरेश गोसावी यांनी वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

**प्रशासन मनाई**

पुणे जिल्ह्यातील पर्यटन स्थळांवर संध्याकाळी 6 नंतर पर्यटकांना थांबण्यास जिल्हा प्रशासनानं मनाई केली आहे. लोणावळा इथल्या भुशी धरणावर काल घडलेल्या दुर्घटनेत एकाच कुटुंबातील 5 जण वाहून गेल्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी आज हा निर्णय घेतला आहे. पावसाळ्यात विविध पर्यटन स्थळांवर आणि धबधब्यांवर पर्यटक मोठ्या संख्येनं जातात. मात्र अनेक ठिकाणी जंगलात रस्ता चुकतात किंवा धबधब्याच्या ठिकाणी पाण्याचा अंदाज न आल्यानं दुर्घटना घडतात. हे टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

**रस्ता रुंदीकरण**

पुणे शहरातील कात्रज-कोंढवा रस्त्याचे रुंदीकरणासाठी राज्य सरकारने 139 कोटी रुपये महापालिकेच्या तिजोरीत जमा केल्यामुळे या रस्त्याच्या भूसंपादनाचा प्रश्न आता मार्गी लागणार आहे.या परिसरात मोठ्या प्रमाणावर वस्ती वाढल्यामुळे बाह्यवळण रस्ताही आता कमी पडू लागला आहे.

**फळझाड रोपे**

पुण्यातील महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या शिवाजीनगर मधल्या फळ रोपवाटिकेत यंदा विविध फळझाडांची सुमारे 53 हजार कलमे रोपे तयार करण्यात आली आहे. शेतकरी आणि ग्राहकांना ही रोपं वाजवी दरात उपलब्ध करून देण्यात आली असून 15 हजाराहून अधिक झाडांची विक्री पूर्ण झाली आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज पावसाच्या हलक्या सरी बरसल्या. उद्याही हलक्या ते मध्यम पावसाचा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**